# जावे त्याच्या गांवा ... (व्हॅन्कूव्हर, कॅनडा)

## सखी सहवास

२००७ साल संपत आलं होतं, नवीन वर्षी वेगळं काय करता येईल ह्या विचारात मी होते. माझ्या काही मैत्रिणींनी सुचवले बायकांची "किटि पार्टी" सुरु करुया. बायकांनी एकत्र यावं ही कल्पना मल खूप आवडली, पण "किटि पार्टी" हे कारण मनाला पटत नव्हतं. निव्वळ वेळ घालवायचा म्हणून न भेटता, अशा स्नेह संमेलनातून वेळेचा सदुपयोग करता येईल का? ह्या विचाराने आमचे व्हॅन्कूव्हर मधील मराठी बायकांचे संमेलन ठरले. २००८च्या जानेवारी महिन्यात संक्रातीच्या निमित्ताने आम्हा बायकांची पहिली जत्रा भरली.

ह्या नव्या उपक्रमाला छान प्रतिसाद मिळाला आणि २००८ साली चार वेळा सखी संमेलने पार पडली. आपल्या सर्व जवाबदाऱ्या, विवंचना बाजूला ठेवून थोडा वेळ एकत्र घालवावा, नवीन ओळखी कराव्यात आणि नवीन काही शिकावे हा हेतू साध्य होत होता. ही प्रथा सुरू रहावी असं वाटत असतांनाच काही कारणास्तव त्यात खंड पडला.

एखादी चांगली गोष्ट सुरु होऊन बंद झाली त्याचा खेद होता. माझ्या मनातील खंत मी विद्युल्लेखा अकलूजकर ह्यांना बोलून दाखवली. त्यांनी मला जाणवून दिलं की एकत्र येण्यामागचा हेतू स्पष्ट हवा. हा उपक्रम नवीन स्वरूपात सुरु करावा, एक विषय घेवून त्यावर बायकांना आपली मतं मांडण्यास सांगावी, वैचारिक देवाण घेवाण होत असतांना आपलीच आपल्याला नव्याने ओळख होईल. गप्पा, खाणं, हे सर्व ओघाने होईलच पण काहीतरी नवीन शिकल्याचा आंनद मिळेल.

विद्युल्लेखा अकलूजकर ह्यांनी पुढाकार घेतला आणि ५ डिसेंबर २००९ रोजी त्यांच्या घरी पहिला "सखी–सहवास" ठेवला. विषय होता: "माझा आवडता छंद." विविध क्षेत्रात काम करणाऱ्या, वेगवेगळ्या वयोगटातील नव्या जुन्या मैत्रिणींना भेटण्याचा योग त्या दिवशी आला. आवडता छंद ह्या विषयावर आम्ही सर्वजणी मोकळेपणाने बोललो. आमच्यातील अनेक जणींनी बुद्धीला चालना देणारे छंद जोपासले होते, तर काहींनी स्वत:ला सेवाभावी उपक्रमांमध्ये वाहून घेतलं होतं. आमच्याच व्यक्तिमत्वाचे हे वेगळे पैलू त्या दिवशी आम्हाला ठळकपणे जाणवले.

१४ फेब्रुवारी २०१०, नवीन वर्षातील सखी–सहवास माझ्या घरी ठरला. त्या दिवसाचे माहात्म्य लक्षात घेता "प्रेम" हाच विषय ठरला. गाणं, कविता, गोष्ट, परिसंवाद अशा स्वरूपात "प्रेमाची" विविध रूपे व्यक्त झाली. काहीजणींनी कविता स्वत: लिहिल्या होत्या. खरंच आपल्या सर्वांमध्ये सुप्त गुण असतात पण आपण त्याबद्दल अनभिज्ञ असतो. ह्या सखी–सहवासाने अजून एक सुखद आठवण आम्हा सर्वांकडे जमा झाली. पूर्वी स्त्रियांना मोकळीक आणि स्वातंत्र्य नव्हते. पण तेव्हासुद्धा मंगळागौर, गौरी, डोहाळे जेवण अशा "फक्त स्त्रियांसाठी" असलेल्या कार्यक्रमात स्त्रिया एकत्र येत व आपल्यातील सुप्त कलागुणांना वाव देत असत. आज परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे; पत्नी, आई, मुलगी, बहीण अशी सर्व नाती सांभाळत असतांना आपण एक स्वतंत्र व्यक्तिमत्व आहोत हे आपणाला सतत जाणवत असते. हे व्यक्तिमत्व फुलवत ठेवायची संधी जर मिळाली तर आपल्याला हवीच असते.

आमच्या सखी–सहवासातर्फे अशीच एक संधी उपलब्ध झाली आहे. असं म्हणतात एकत्र येणं ही सुरुवात आहे, आमच्या सखी सहवासाची सुरुवात तर छान झाली आहे. हा सहवास असाच निरंतर सुरू रहावा हीच सदिच्छा!!!!

**वैशाली भिडे (व्हॅन्कूव्हर, कॅनडा)**

***

## व्हॅन्कूव्हरचे क्रीडाजगत्

यंदा फेब्रुवारी आणि मार्चमध्ये व्हॅन्कूव्हर (कॅनडा) येथे हिवाळी ऑलिम्पिक आणि पारालिम्पिक खेळांच्या स्पर्धा झाल्या. यंदा नेहेमीपेक्षा जरा कमी हिमवृष्टी झाल्यामुळे या स्पर्धांसाठी इतर डोंगरांवरून हेलिकॉप्टर व ट्रक्सने बर्फ आणावा लागला. तरी पण हवामान लोकांच्या दृष्टीने उत्तम होते. स्पर्धांसाठी आलेल्या प्रेक्षकांना खेळांबरोबरच उत्तरेला हिमशिखरे, जागोजागी पाण्याचे प्रवाह आणि छोट्या छोट्या टेकड्यांवर व सर्वत्र हिरवळीचे हिरवे गालीचे अशा नयनरम्य देखाव्यांचाही लाभ झाला. अनेक देशातून खेळाडू, कोच आणि प्रेक्षक आले होते.

१२ फेब्रुवारी रोजी डॉक्टर रोग्गे यांनी ऑलिम्पिक खेळांच्या स्पर्धेची सुरवात झाल्याची घोषणा केली. उद्घाटनाचा सोहोळा अतिशय छान झाला. दुसऱ्या दिवसापासुन विविध खेळांच्या स्पर्धा सुरू झाल्या. बरीचशी पविलियन्स वेगवेगळ्या देशांनी, कॅनडातल्या विविध प्रांतांनी आणि खाजगी कंपन्यांनी उभारली होती. त्या सगळ्या पविलियन्स बघण्याकरता बऱ्याच लांब रांगा होत्या. ६–७ तास बिनतक्रार रांगेत लोक उभे असत. सर्व लोकांना स्पर्धा प्रत्यक्ष बघायला मिळणे शक्य नसल्यामुळे जागोजागी टी. व्ही च्या मोठ्या पडद्यावर स्पर्धांचे थेट प्रक्षेपण केले जात होते. पोलीस आणि कनेडियन सैनिकही शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी देखरेख करीत होते. उदाहरणार्थ कुणी उघडलेली दारूची बाटली आणली तर पोलीस त्यांच्यासमोरच ती ओतून टाकत होते.

ऑलिंपिक स्पर्धेचे 'स्पिरिट' काही खेळाडू कसे दाखवतात याची दोन उदाहरणे माझ्या चांगल्या स्मरणात राहतील. कॅनडाच्या फिगर स्केटरची आई तिच्या स्पर्धेच्या २ दिवस आधी अचानक वारली तरी सुध्दा त्या धैर्यवान मुलीने स्पर्धेत भाग घेऊन ब्रॉन्झ पदक मिळवले. पदक स्विकारतांना तिच्या चेहेऱ्यावरील दु:ख अजूनही माझ्या डोळ्यांसमोर आहे. जॉर्जिया देशातील एक स्कीयर स्पर्धा चालू असतांना पडली आणि तिच्या बरगड्यांना दुखापत होऊन फुफ्फुसांना छोटेसे छिद्र पडले होते. पण त्या मुलीने तसल्या अवस्थेत स्पर्धा पूर्ण करून ब्रॉन्झ पदक मिळवले. एकंदर या ऑलिंपिक खेळांमध्ये कॅनडाला सर्वाधिक सुवर्णपदके आणि अमेरिकेला सर्वाधिक पदके मिळाली.

ह्या हिवाळी ऑलिंपिक खेळांच्या स्पर्धांच्या तुलनेने पारालिम्पिक

स्पर्धांना उपस्थितांची व खेळाडूंची संख्या मर्यादित होती. परंतु पारालिम्पिक स्पर्धेतील सर्व खेळाडूंची जिद्द कौतुकास्पद आहे. उदाहरणार्थ: आमच्या व्हॅन्कूव्हर गावातील लॉरेन ह्या खेळाडूला दोन्ही पाय आणि डावा हात नाही. तरी कृत्रिम पाय लावून उभ्या स्कीईंग स्पर्धेत तिने पाच सुवर्णपदके मिळवली. आमच्यासारख्या कसलेही शारिरीक व्यंग नसलेल्यांना हे पारालिम्पिकचे खेळाडू सहज हरवू शकतील.

व्हॅन्कूव्हरमध्ये झालेल्या यंदाच्या ऑलिम्पिक आणि पारालिम्पिक खेळांच्या स्पर्धांचे आयोजन यशस्वी होण्यासाठी आणि त्यानिमिताने आलेल्या पाहुण्यांची चोख व्यवस्था ठेवण्यासाठी व्हॅन्कूव्हरमधील मराठी तसेच अमराठी भाषक अशा सर्वांनी मोलाचा हातभार लावला.

**गिरीश मुजुमदार (व्हॅन्कूव्हर, कॅनडा)**